# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./4340 /२०२१ दि. 06 /०४/२०२१

## परिपत्रक

संदर्भ :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. जिका/क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि-३९५/२०२१, दि. ०५/०४/२०२१.

विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विभाग प्रमुख तसेच गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता व सदर विषाणूचा प्रसार व प्रभाव यामध्ये वाढ होऊ नये त्याअनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. जिका/क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि-३९५/२०२१, दि. ०५/०४/२०२१ नुसार कार्यवाही घेऊन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

संलग्नित - संदर्भिय आदेशाची पत्र.

6.4.2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर:-

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, गडचिरोली जि. गडचिरोली.
३. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्ह्यातील संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याच्या कार्यवाहीस्तव.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गो. वि. गड.

6.4.2021
(डॉ. विजय सिल्हारे)
उपकुलसचिव (आस्थापना व प्रशासन)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## महाराष्ट्र शासन
## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
**तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५**

▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३१,

▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com


**जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि- ३९५ /२०२१** **दिनांक :- ०५ एप्रिल, २०२१**

**वाचा :**

१. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई, अधिसुचना दि.१४.०३.२०२०
२. भारत सरकार, गृह विभाग, यांचे आदेश क्र. ४०-३/२०२०-DM-१(A), दिनांक २४.०३.२०२
३. या कार्यालयाचे आदेश दिनांक ११.०३.२०२०,१६.०३.२०२०,२०.०३.२०२०,२२.०३.२०२०, २३.०३.२०२०, २६.०३.२०२०, ०३.०४.२०२०, १३.०४.२०२०, १७.०४.२०२०, १९.०४.२०२०, २४.०४.२०२०, ०३.०५.२०२०, ०८.०५.२०२०, १८.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २५.०६.२०२०, २६.०६.२०२०, २७.०६.२०२०, २९.०६.२०२०, ०६.०७.२०२०, ३०.०७.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२०, २४.१०.२०, ३१.१०.२०, ०४.११.२०२०, १६.११.२०२०, १७.११.२०२०, २४.११.२०२०, २५.११.२०२०, ३०.११.२०२०, २२.१२.२०२०, १८.१२.२०२१, ३१.१२.२०२०, २९.०१.२०२१, २६.०२.२०२१, २.०३.२०२१, ०९.०३.२०२१, १६.०३.२०२१, ३०.०३.२०२१
४. भारत सरकार, गृहविभाग, यांचे आदेश No. ४०-३/२०२०-DM-I (A) दिनांक १५.०४. २०२०, १९.०४.२०२०, २१.०४.२०२०, २४.०४.२०२०, २९.०४.२०,०१.०५.२०२०,१५.१४.०५.२०२०, ३०.५.२०२०, २९.०७.२०२०, २९.०८.२०२०, २७.१०.२०२०, २१.११.२०२०, २३.११.२०२०, २८.१२.२०, २७.०१.२०२१, २३.०३.२०२१
५. आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र शासन, यांचे आदेश क्र. आव्यप्र/२०२०/ सीआर-९२/आव्यप्र-१/दि. २५/०३/२०२०, १५.०४.२०. १७.०४.२०२०, २१.०४.२०२०. २३.०४.२०, २४.०४.२०२०, २८.०४.२०२०, ३०.०४.२०२०, ०१.०५.२०२०, ०२.०५.२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.०५.२०२०, १७.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २०.०६.२०२०, २५.०६.२०२०, २९.०६.२०२०, २९.०७.२०२०, ३१.०८.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२० २९.१०.२०२०, ०३.११.२०२०, १४.११.२०२०, २३.११.२०२०, २७.११.२०२०, २४.१२.२०२०, २९.१२.२०२०, २९.०१.२०२१, २४.०२.२०२१, ०२.०३.२०२१, १५.०३.२०२१, २७.०३.२१, ०४.०४.२१

# आदेश

**(फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ तसेच कोविड-१९ साथरोगअंतर्गत टाळेबंदीबाबत नियमावली)**

**ज्याअर्थी,** संदर्भिय अधिसूचना क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र राज्यात दिनांक १३.०३.२०२० पासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या अधिनियमाअंतर्गत खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे याकरीता या कार्यालयाचे संदर्भिय २ नुसार विविध आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सद्यस्थितीत सदर आदेशाच्या तरतूदी गडचिरोली जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी,** उक्त संदर्भ क्रमांक ०५ मधील दिनांक २७/०३/२०२१ चे शासन आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यात कोविड-१९ साथरोगसंदर्भाने उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना कालावधी **दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक १५ एप्रिल, २०२१** पर्यंत वाढविण्यात आलेला असून या कार्यालयाचे आदेश क्र. ३७०, दिनांक ३०/०३/२०२० अन्वये, फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये जिल्हयात मनाई आदेश व कोविड-१९ साथरोग संदर्भाने मिशीन बिगीन अगेन अंतर्गत नियमावली व उपाययोजना जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी,** उक्त संदर्भ क्र. ५ चे दि. ०४.०४.२०२१ चे शासन पत्रातील तरतुदीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील नागरी, ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्रातील जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.०३ वर नमुद यापूर्वी लॉकडाऊन संदर्भांत सुधारित आदेश काढणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी दीपक सिंगला, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** वरील संदर्भ क्र. ४ व ५ चे अधिन राहून शासन निर्देशाप्रमाणे कोविड - १९ साथरोग अंतर्गत उक्त संदर्भ क्र. ३ मधील मिशन बिगीन अगेन अंतर्गत वेळोवेळी सुरु केलेले व प्रतिबंधित बाबींना जिल्हा गडचिरोली सीमा क्षेत्रात जमावबंदी व टाळेबंदीसंदर्भात नियमावली आणि उपाययोजना कालावधी **दिनांक ३० एप्रिल, २०२१ चे २४.०० पर्यंत लागू करीत आहे.** याअंतर्गत जिल्हा गडचिरोली सीमा क्षेत्रात ***(कंटेनमेंट झोन वगळून)*** *ज्या बाबींना शासन व जिल्हा प्रशासनाचे आदेशानुसार सुरु ठेवण्याची परवानगी अनुज्ञेय असेल ते सुरु ठेवण्याची मुभा असेल तर ज्या बाबींना प्रतिबंध आहे त्यांना पुढील आदेशापर्यंत सुरु करता येणार नाही.* तसेच शासन व जिल्हा प्रशासनाचे निर्देशाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशातील सर्व निर्देश, सूचना, अटी व शर्तीचे पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकारक असेल. **उक्त संदर्भ क्र. ५ मधील दि. ०४.०४.२०२१ चे शासन आदेशातील अटी, शर्ती, दंडाबाबत निर्देशाचे काटेकोर पालन करणे सर्व संबंधित विभागांना बंधनकारक असेल.**

### १. कलम १४४ अंतर्गत जमावबंदी:-

a. गडचिरोली जिल्हा सीमा क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये दि. ३०.०४.२०२१ चे रात्रौ १२.०० पर्यंत जमावबंदी आदेश अंमलात असेल.

b. सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७ ते रात्री ८ या कालावधीत पाच (०५) हून अधिक लोकांना एकत्र जमण्यास मज्जाव असेल.

c. सोमवार ते शुक्रवार रात्री ८ ते सकाळी ७ तसेच शुक्रवार रात्री ८ ते सोमवार सकाळी ७ पर्यंत कोणत्याही सबळ/अतितातडीच्या कारणाशिवाय किंवा परवानगीशिवाय सार्वजनिक ठिकाणी फिरण्यावर बंदी असेल.

d. तथापि, अत्यावश्यक सेवा व वैद्यकिय क्षेत्राशी निगडीत व्यक्तींना वरील बंधन लागू नसेल.

e. अत्यावश्यक सेवा यामध्ये खालील बाबीचा समावेश असेल.

   i. रूग्णालये तपासणी/ निदान केंद्रे, रूग्ण तपासणी केंद्र, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध निर्माण कार्यशाळा, औषध निर्माण करण्याच्या कंपन्या, औषधी विक्री केंद्र आणि वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत आस्थापना आणि उपक्रम.
   ii. किराणामाल दुकान, भाजी विक्रीची दुकाने, डेअरी, बेकरी, मिठाई विक्रीची दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्र.
   iii. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था- रेल्वे, टॅक्सी, ॲटोरिक्शा, सार्वजनिक वाहतूक बसेस
   iv. विविध देशाच्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या कामकाजाशी निगडीत सेवा
   v. स्थानिक प्रशासनाद्वारा करावयाची मान्सूनपूर्व कामे
   vi. स्थानिक संस्थाव्दारा पार पाडल्या जाणारी सर्व सार्वजनिक स्वरूपाची कामे
   vii. मालवाहतूक
   viii. शेती क्षेत्राशी निगडीत सेवा
   ix. ई- कॉमर्स
   x. प्रसार माध्यमे
   xi. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाने अत्यावश्यक म्हणून ठरविलेल्या सेवा/बाबी

## २. आऊटडोअर बाबी:-

a. **उद्याने/पार्क/सार्वजनिक मैदाने**, शुक्रवारी रात्री ८.०० ते सोमवारी सकाळी ७.०० वाजेपर्यंत पूर्णपणे बंद राहतील. तर सोमवार ते शुक्रवार या कालावधीत सकाळी ७ ते रात्रौ ८ पर्यंत सुरु ठेवता येईल व रात्री ८.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत बंद असतील.

b. सोमवार ते शुक्रवारी सकाळी ७.०० ते रात्री ८.०० या कालावधीत घराबाहेर पडतांना नागरीकांनी कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये मास्क लावणे, वेळोवेळी हात धुणे, सामाजिक अंतर राखणे इत्यादी सर्व बाबींचे अनिवार्यपणे पालन करणे गरजेचे असेल.

c. उक्त संदर्भाने नागरिकांकडून कोविड-१९ साथरोगसंदर्भाने दिलेल्या दिशानिर्देशाचे उचित पालन होत असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित भागातील महसूल/पोलीस/स्था.स्व.संस्था यांची असेल. वरीलपैकी कुठल्याही भागात नागकरिकांकडून आवश्यक खबरदारी न घेतल्यामुळे कोविड-१९ साथरोग वाढत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर परिसर तात्काळ अंमलाने बंद करण्याबाबत संबंधित तहसिलदार यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

## ३. दुकाने, बाजारपेठा, मॉल्स् इत्यादीबाबत:-

**अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दुकाने, बाजारपेठा पूर्णपणे बंद राहील.**

a. अत्यावश्यक सेवेशी निगडीत दुकानांमध्ये ग्राहकांना प्रवेश देतांना सामाजिक अंतराचे पालन होईल याबाबत खबरदारी घेण्यात यावी. अधिकचे ग्राहकांना दुकानाबाहेर थांबवावे. त्यांनी सामाजिक अंतर पाळावे म्हणून शक्यतोवर उभे राहण्याच्या जागा आखून द्याव्यात.

b. केंद्र शासनाचे निर्देशास अधिन राहून अत्यावश्यक सेवेशी निगडीत दुकानदार, दुकानात काम करणारे कर्मचारी यांचे शक्य तेवढया लवकर लसीकरण करण्यात यावे. दुकानदारांनी ग्राहकांशी संपर्क करतांना दुकानदार व ग्राहक यांच्या दरम्यान काच अथवा पारदर्शी पडदा राहील अशी व्यवस्था करावी. शक्यतोवर इलेक्ट्रॉनिक/डिजीटल पेमेन्ट पध्दतीचा वापर करावा.

c. जी दुकाने सद्यस्थितीत बंद करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे त्या दुकानदारांनी आणि तेथील कर्मचाऱ्यांचे देखील केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मापदंडानुसार तात्काळ लसीकरण करण्यात यावे तसेच भविष्यात दुकाने सुरू करण्याकरिता ग्राहक आणि दुकानदार यांच्यात काच अथवा पारदर्शी पडदा अशा व्यवस्था आताच करून घ्याव्यात ज्यामुळे भविष्यात दुकाने सुरू करतांना सुलभता येईल. इलेक्ट्रॉनिक पेमेन्ट पध्दतीचा वापर प्राधान्याने करावा व भविष्यात ही दुकाने सुरू करण्याबाबतचा निर्णय प्रशासनाला घेता येईल.

## ४. सार्वजनिक वाहतूक:-

पुढील निर्बंधासह सार्वजनिक वाहतुक पुर्णपणे क्षमतेने कार्यान्वीत राहील:

| | |
|---|---|
| ऑटो रिक्शा | चालक + २ प्रवासी फक्त |
| टॅक्सी (चार चाकी) | चालक + ५०% वाहन क्षमता (RTO नियमाच्या) |
| बस | संपूर्ण बसण्याची क्षमता (RTO परवानगी प्रमाणे) नुसार प्रवासी बसविण्यास परवानगी असेल परंतु कोणासही उभे राहून प्रवास करण्यास मज्जाव असेल. |

a. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणारे सर्व वयक्तींना सक्तीने मुखवटा घालणे अनिवार्य आहे, अन्यथा ५००/- रुपये दंड ठोठावण्यात येईल.
b. चारचाकी टॅक्सीमध्ये जर एखादया व्यक्तीने मुखवटा घातलेला नसेल तर त्या व्यक्तीला आणि टॅक्सी चालकाला प्रत्येकी ५००/- रुपये दंड आकारला जाईल.
c. प्रत्येक ट्रीपनंतर सर्व वाहने स्वच्छ (sanitized) करण्यात यावे.
d. सर्व सार्वजनिक वाहतुकीमध्ये कार्यरत चालक आणि इतर कर्मचारी हे लोकांच्या संपर्कात येत असतात त्यामुळे केंद्रशासनाच्या निकषानुसार त्यांनी लवकरात लवकर लसीकरण करावे आणि पूर्णपणे लसीकरण होईपर्यंत १५ दिवसा पर्यंत वैध असलेले नकारात्मक कोरोना निकाल प्रमाणपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे. हा नियम १० एप्रिल २०२१ पासुन लागु होईल.
e. जर वरीलप्रमाणे नकारात्मक RTPCR प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले किंवा वरीलप्रमाणे लसीकरण न केल्यास १०००/- रुपये दंड आकारला जाईल.
f. स्टेशन बाहेरील गाडयांच्या बाबतीत, रेल्वे अधिकारी हे सामान्य बोगी मध्ये कोणताही प्रवासी उभा राहत नसल्याचे खात्री करील आणि सर्व प्रवासी मुखवटा परिधान करतील याची खबरदारी घेतील
g. मुखवटा परिधान न करणाऱ्यांसाठी सर्व रेल्वे गाडयांमध्ये ५००/- रुपये प्रति व्यक्ती दंड आकारला जाईल.

## ५. कार्यालय:-

a. पुढील बाबी वगळून सर्व खाजगी कार्यालये वगळता बंद राहील.
   i. सहकारी, सार्वजनिक क्षेत्रातिल उपक्रम व खाजगी बँका.
   ii. विद्युतपुरवठा संबंधित कंपन्या.
   iii. टेलिकॉम सेवा पुरवठादार.
   iv. वीमा, मेडिक्लेम कंपनी.
   v. औषधी उत्पादन/वितरण व्यवस्थापनासाठी असलेली कंपनी कार्यालये.
   vi. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अपवादात्मक परिस्थितीत काही बाबी समाविष्ट करु शकेल

b. शासकीय कार्यालये ५०% उपस्थिती क्षमतेने चालू राहातील. तथापि जी कार्यालये कोविड-१९ साथरोग या कामकाजा संबंधित असतील ती कार्यालये १००% उपस्थितीत विभागप्रमुखांच्या निर्णयान्वये सुरु राहतील.
c. ऊर्जा,पाणी आणि बँकींग व इतर वित्तीय सेवा पुरवणाऱ्या सेवा संबंधित सर्व सरकारी कार्यालये तसेच सरकारी कंपन्या सर्व क्षमतेने कार्यरत राहतील.
d. शासकीय कार्यालय तसेच शासकीय कंपन्याच्या बाबतीत सर्व बैठका ऑनलाईन द्वारे/VC द्वारे घ्यावे.
e. शासकीय कार्यालय तसेच कोणत्याही शासकीय कंपन्यामध्ये अभ्यागतांना भेटण्या करीता परवांनगी देण्यात येणार नाही त्या करिता कार्यालयामध्ये E-Visitor System तात्काळ सुरु करण्यात यावा.
f. अपवादात्मक परिस्थितीत जर शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यांगतांना प्रवेश दयावयाचा असेत तर कार्यालय प्रमुखाने अभ्यागतांसाठी पासेस वाटप करण्यात यावेत. ज्यांचे कडे ४८ तासांच्या आतील नकारात्मक RTPCRप्रमाणपत्र असेल त्यांनाच कार्यालयामध्ये प्रवेश देण्यात यावे.
g. खाजगी आणि शासकिय अशा दोन्ही कार्यालयामध्ये केंद्रशासनाच्या निकषाप्रमाणे तात्काळ संपूर्णपणे लसीकरण करण्यात यावे.

## ६. खाजगी वाहतूक:-

खाजगी बसेससह खाजगी वाहने सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ०७:०० ते संध्याकाळी ०८:०० वाजेपर्यंत प्रवास करु शकतील तर आपातकालीन किंवा अत्याआवश्यक सेवाच्या उदेशाने सोमवार ते शुक्रवार मध्ये संध्याकाळी ०८:०० वाजेपासुन सकाळी ०७:०० वाजेपर्यंत वा शुक्रवारी संध्याकाळी ०८:०० वाजेपासुन ते सोमवारी सकाळी ०७:०० वाजेपर्यंत प्रवास करु शकतील.

**याव्यतिरिक्त खाजगी बसेस करिता पूरक सूचना:-**

a. फक्त आसन क्षमतेसह वाहतुक करता येईल. सीटअभावी कोणताही प्रवासी उभा नसावा.
b. खाजगी वाहतुकीमध्ये कार्यरत चालक आणि इतर कर्मचारी यांनी केंद्रशासनाच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करणे आणि पुर्णपणे लसीकरण होई पर्यंत १५ दिवसा पर्यंत वैध असलेले नकारात्मक कोरोना निकाल प्रमाणपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे. हा नियम १० एप्रिल २०२१ पासुन लागू होईल.

## ७. करमणूक/मनोरंजन:-

a. **सिनेमागृहे बंद राहतील.**
b. नाटक थियेटर आणि प्रेक्षागृहे (auditorium)बंद राहतील.
c. मनोरंजन पार्क/आरकेड/व्हीडीओगेम पार्लर बंद राहतील.
d. पाण्याचे उद्याने बंद राहतील.
e. **क्लब, जलतरण तलाव, व्यायामशाळा व क्रीडासंकुल बंद राहतील.**
f. तथापि उक्त आस्थापनाशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी केंद्रशासनाच्या निकषाप्रमाणे तात्काळ संपुर्णपणे लसीकरण करुण घ्यावे जेणे करुन शासन सर्व वरील प्रमाणे आस्थापना कोविड-१९ चा प्रादुर्भाव अथवा प्रसार यांचा भितीशिवाय पुन्हा सुरु करु शकतील.

## ८. रेस्टारेंट, हॉटेल:-

a. **सर्व प्रकारचे रेस्टारेंट बंद असतील.**
b. सोमवार ते शुक्रवार पर्यंत सकाळी ०७:०० ते संध्याकाळी ०८:०० वाजेपर्यंत खाद्यपदार्थांची ऑर्डर, पार्सल आणि घरपोच सेवा सुरु ठेवता येईल. तथापि शुक्रवार सायं. ८ ते सोमवारी सकाळी ७ पर्यंत फक्त घरपोच सेवा सुरु राहील व कोणत्याही हॉटेल/रेस्टॉरेन्ट मध्ये ऑर्डर करिता भेट देता येणार नाही.
c. हॉटेल मधील उपलब्ध जेवण्याची व्यवस्था केवळ सदर हॉटेल मध्ये वास्तव्यास असलेल्या व्यक्तींकरिता असेल. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील व्यक्तींना/पाहुण्याना या प्रवेश दिला जाणार नाही. बाहेरील लोकांनी वर नमूद केल्याप्रमाणे निर्बंधाचे अनुसरण करावे.
d. घरपोच वितरण सेवा देणारे सर्व कर्मचारी यांना केंद्र शासनाचे निकषाप्रमाणे तात्काळ लसीकरण देण्यात यावे तथापि जर व्यक्तीला लस दिली गेली नाही तर त्यांनी स्वत:कडे १५ दिवसापर्यंत वैध असलेली नकारात्मक RTPCR चाचणी निकाल ठेवावा. सदरचे नियम १० एप्रिल २०२१ पासुन अमलात येतील.
e. Negative RTPCR प्रमाणपत्राशिवाय वा पूर्ण लसीकरणाशिवाय तसेच RTPCR Negative चाचणीशिवाय घरपोच होम डिलीव्हरी/पार्सल देणाऱ्या व्यक्तींना १० एप्रिल २०२१ नंतर रु. १,०००/- दंड आकरण्यात येईल तसेच सदरचे आस्थापनेवर रु. १०,०००/- दंड आकारण्यात येईल.सदर बाबींची पुनरावृत्ती झाल्यास आस्थापनेचा परवाना/मंजूरी कोविड-१९ अधिसूचना जारी असपेर्यत रद्द करण्यात येईल. याबाबत आवश्यक कारवाई संबंधित तहसिलदार यांनी करावी.
f. रेस्टारेंट/उपहारगृह/हॉटेल मध्ये काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लसीकरण करणे आवश्यक आहे.

## ९. धार्मिकस्थळे/प्राथनास्थळे:-

a. **धार्मिक स्थळे व प्रार्थनास्थळे बंद राहतील.**
b. प्रार्थना स्थळांमध्ये सेवा देणा-या व्यक्तींनी मंदिराच्या आत पूजा-अर्चना करण्यास परवानगी असेल परंतू कोणत्याही बाहेरील व्यक्तीला प्रवेश देण्यात येवू नये.
c. अशा स्थळी काम करणा-या सर्व व्यक्तींना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लसीकरण करुन घ्यावे जेणेकरुन असे स्थळ पुन्हा खुले करण्यासाठी सोपे जाईल.

## १०. सलून दुकाने/स्पा/ब्युटी पार्लर दुकाने:-

a. **सलून दुकाने/स्पा/सलून व ब्युटी पार्लर पुर्णत: बंद राहतील.**
b. अशा स्थळी काम करणा-या सर्व कर्मचा-यांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे जेणेकरुन असे दुकाने पुन्हा खुले करण्यासाठी सोपे जाईल.

## ११. वृत्तपत्रे/वर्तमानपत्रे:-

a. **वर्तमानपत्रांची छपाई व वितरण सर्व दिवस करता येईल.**
b. घरपोच सेवा सर्व दिवशी सकाळी ७.०० ते रात्री ८.०० वाजतापर्यंत परवानगी असेल.
c. यामध्ये संलग्न असलेल्या सर्वांनी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्वरीत लसीकरण करुन घ्यावे. होम डिलीव्हरी करणा-या व्यक्तींनी Negative RTPCR प्रमाणपत्र सोबत ठेवावे, जे १५ दिवस वैध राहील. हा आदेश दिनांक १० एप्रिल २०२१ पासून अंमलात येईल.

## १२. शाळा व महाविद्यालये:-

a. **सर्व शाळा व महाविद्यालये बंद राहतील.**
b. १० वी व १२ वी च्या परीक्षेस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना यातून सुट देण्यात येत असून परीक्षा घेणा-या सर्व कर्मचारी वर्ग यांनी लसीकरण करुन घ्यावे किंवा त्यांनी RTPCR चाचणी Negative असल्याचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे. RTPCR चाचणी केल्यापासून ४८ तासापर्यंत सदर प्रमाणपत्र वैध राहील. (याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेशी समन्वय साधून सर्व संबंधितांचे चाचणी करुन घ्यावी.)
c. राज्या बाहेरील बोर्ड, विद्यापीठ व प्राधिकरणाद्वारे घेण्यात येणा-या परीक्षेस बसण्याची परवानगी नाकारल्यास महाराष्ट्रात राहणा-या विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होवू शकते, सबब संबंधित बोर्ड/विद्यापीठ यांचे सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करणे विद्यार्थ्यांचे हिताचे राहील.
d. **सर्व प्रकारचे खाजगी शिकवणी वर्ग बंद राहतील**. अशा आस्थापनेमध्ये काम करणा-या सर्व कर्मचा-यांना सल्ला देण्यात येते की, त्यांनी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार तात्काळ लसीकरण करुन घ्यावे जेणेकरुन सदर आस्थापना भविष्यातपुन्हा सुरु करण्यास सोपे जाईल.

## १३. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांबाबत:-

a. **कोणत्याही धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांना परवानगी राहणार नाही.**
b. ज्या जिल्हयात **निवडणूक कार्यक्रम जाहीर** झाला अशा जिल्हयात जिल्हाधिकारी राजकीय सभांना खालील अटींच्या अधिन राहून मंजूरी देतील.

i. निवडणूकीचा प्रचार करण्याकरीता राजकीय सभा घेण्यासाठी मा. निवडणूक आयोग, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार परवानगी देण्यात येईल. अशा ठिकाणी ५० व्यक्ती किंवा क्षमतेच्या ५०% यापैकी कमी असलेल्या संख्येत बंद ठिकाणी सभा घेण्यास परवानगी देण्यात येईल तसेच अधिकतम २०० किंवा क्षमतेच्या ५०% इतके व्यक्तींच्या खुल्या जागेतील सभा कोविड-१९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार अशा सभेत निर्धारित संख्येपेक्षा अधिकचे व्यक्ती जमा होणार नाही याबाबत संबंधित भागाचे तहसिलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी-न.पं./नप यांचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल.

ii. सदर प्रोटोकॉलचे भंग झाल्यास जागेच्या मालकास जवाबदार समजून त्यांचेकडून आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलमानुसार दंड आकारण्यात येईल. गंभीर प्रकारच्या कायद्यांचे भंग झाल्यास अशी जागा कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव संपेपर्यंत सील करण्यात येईल.

iii. एखाद्या उमेदवाराने २ पेक्षा अधिक शर्ती/अटींचे भंग केल्यास त्यांना पुढे राजकीय सभा घेण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही.

iv. मोर्चे, कलापथक/पथनाट्य/नुक्कड वा इतर तत्सम सभा किंवा इतर कोणत्याही सभेचे आयोजन करतांना कोविड-१९ प्रोटोकॉलचे पालन करण्यात यावे.

v. सर्व मार्गदर्शक तत्वे निवडणूकीच्या प्रक्रियेत भाग घेणा-या सर्व लोकांना भितीशिवाय व पक्षपात न करता सर्वांना सारख्याच प्रमाणात लागू राहतील. तसेच या मार्गदर्शक सूचनांच्या निवडक व पक्षपाती उपयोगामुळे कोणत्याही तक्रारी उदभवणार नाही याची काळजी घ्यावी.

c. **<u>लग्न समारंभात जास्तीत जास्त ५० वयक्तींना उपस्थित राहण्याची परवानगी राहील.</u>**

i. मंगल कार्यालये किंवा लग्न स्थळी सेवा पुरविणा-या व्यक्ती तसेच हजर राहणा-या सर्व व्यक्तींचे पूर्ण लसीकरण होणे आवश्यक राहील. ज्यांचे लसीकरण झाले नाही अशा व्यक्तींनी RTPCR चाचणी Nagative असल्याबाबतचे पत्र सोबत बाळगणे/ठेवणे आवश्यक राहील.

ii. लग्न समारंभात जास्तीत जास्त ५० व्यक्तींना उपस्थित राहण्याची परवानगी राहील.

iii. जर एखाद्या व्यक्तीचे पूर्ण लसीकरण झाले नसून तसेच त्यांचेकडे RTPCR चाचणी Negative असल्याचे प्रमाणपत्र सोबत नसल्यास अशा प्रत्येक व्यक्तींवर रु. १,०००/- दंड आकारण्यात येईल व लॉन/सभागृह/मंगल कार्यालयांच्या आस्थापनेवर रु. १०,०००/- दंड आकारण्यात येईल.

iv. पुनरावृत्ती झाल्यास मंगल कार्यालयास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल तसेच अशा मंगल कार्यालयात कोणताही सोहळा आयोजित करण्यास कोविड-१९ रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यंत जागा सील करण्यात येईल.

d. अंत्ययात्रेत जास्तीत जास्त २० व्यक्ती सहभागी होवू शकतील आणि अंत्येयात्रेत सहभागी झालेल्या व्यक्तीचे पुर्ण लसीकरण होणे आवश्यक राहील किंवा त्यांचेकडे RTPCR Negative प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

१४. **<u>रस्त्यांच्या कडेला/फुटपाथवरील खाद्य दुकांनाबाबत:-</u>**

a. अशा दुकानात कोणतेही खाद्यपदार्थाची थेट विक्री करता येणार नाही. **पार्सल सुविधा व घरपोच सेवा देता येईल.** अशी दुकाने दर दिवशी सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यतच सुरु राहतील.

b. अशा दुकानात गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी व दुकानात उभे असलेल्या ग्राहकांनी सामाजिक अंतर राखणे आवश्यक राहील.

c. सदर नियमांचे उल्लंघन केल्यास कोविड-१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यंत अशी दुकाने कायम स्वरुपी बंद करण्यात येतील.
d. सदर दुकानाशी संलग्न असलेल्या प्रत्येकांचे पुर्ण लसीकरण होणे आवश्यक आहे व ज्यांचे पुर्ण लसीकरण झाले नाही अशा व्यक्तींनी RTPCR चाचणी Negative असल्याचे प्रमाणपत्र बाळगणे आवश्यक राहील व असे प्रमाणपत्र चाचणी झाल्यापासून १५ दिवसांकरीता वैद्य राहील. सदरचे आदेश १० एप्रिल २०२१ पर्यत प्रभावशिल राहतील. जर एखाद्या प्राधिका-यास वाटले की, सदरचे विक्रेताचे व्यवहार/वागणूक योग्य नसल्यास सदरचे आदेश १० एप्रिल २०२१ नंतर पुढे पण लागू राहील.
e. अशा विक्रेत्यावर बेजवाबदारीपुर्ण वागणूक करणा-या विक्रेत्यावर स्थानिक स्वराज्य संस्था/महसूल/पोलीस विभाग जातीने स्वत: लक्ष ठेवतील व बेजवाबदारपुर्ण वागणुकीबाबत कोविड-१९ च्या प्रोटोकॉलप्रमाणे दंड आकारेल.
f. जर संबंधित तहसिलदारांना असे वाटले की विक्रेता पुन्हा पुन्हा गैरवर्तणुक करीत असून त्यांच्यावर लादलेल्या दंडाचा कोणताही परिणाम होत नाही अशावेळी सदरच्या विक्रेत्याचे दुकान तुर्तास किंवा कायम स्वरुपी बंद करण्याचे आदेशित करेल.

## १५. उद्योग/उत्पादन क्षेत्र:-

a. उत्पादन विभाग खालील अटींच्या अधिन राहून कार्यरत राहील.
b. कारखाना आणि उत्पादन घटक मध्ये काम करणा-या प्रत्येक कामगाराचे प्रवेशापुर्वी शारीरिक तापमान स्कॅन केले जाईल.
c. सर्व कर्मचारी तसेच व्यवस्थापकीय अधिकारी यांचे पूर्ण लसीकरण करणे आवश्यक राहील.
d. जर एखादा कामगार पॉजिटिव्ह आढळल्यास त्यांचे संपर्कात येणा-या सर्व कामगारांना क्वारंटाईन (विलगीकरण) करण्यात यावे व या कालावधीतील त्यांना मंजुरी देण्यात यावी.
e. ज्या कारखान्यात ५०० पेक्षा अधिक कामगार कार्यरत आहेत अशा कारखान्यांनी स्वत:ची क्वारंटाईन (विलगीकरण) व्यवस्था तयार करावी.
f. जर एखाद्या कर्मचारी पॉजिटिव्ह आढळल्यास ते युनिट पुर्णत: सॅनिटाईझ (निर्जंतुकीकरण) करेपर्यत बंद ठेवावे.
g. दुपारचे जेवण व चहाच्या वेळात कर्मचा-यांची गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच जेवण व चहापाण्याकरीता कोणतीही एकत्रित व्यवस्था करण्यात येवू नये.
h. सार्वजनिक शौचालयाचे नियमितपणे सॅनिटाईझ (निर्जंतुकीकरण) करण्यात यावे.
i. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व कर्मचा-यांचे पुर्ण लसीकरण करणे आवश्यक आहे तसेच ज्या कर्मचा-यांचे पुर्ण लसीकरण झाले नाही अशा कर्मचा-यांची RTPCR चाचणी Negative असल्याचे त्यांचेकडे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदरचे RTPCR चाचणी प्रमाणपत्र चाचणीच्या दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत वैद्य राहील.
j. एखाद्या कामगार पॉजिटिव्ह आढळल्यास त्याला/तिला वैद्यकीय रजा मंजूर करण्यात यावी व या कारणाकरीता तो/ती गैरहजर राहील्यामुळे त्याला/तिला अनियमित करण्यात येवू नये. तसेच तो/ती कोरोनाच्या संपर्कात आला नसता तर तिला/त्याला मिळणारा पूर्ण पगार त्यांना देण्यात यावा.

## १६. ऑक्सीजन सिलेंडर्स इ. उत्पादकांसदर्भात-

a. कच्चा माल म्हणून ऑक्सीजनचा निव्वळ ग्राहक आसणारी कोणतीही औद्योगिक दुकाने/व्यवसाये यांनी दिनांक १० एप्रिल २०२१ सदर मागणी करु नये. तथापि अशी मागणी करावयाची असल्यास संबंधित क्षेत्राचे राजस्व उपविभागीय अधिकारी यांचेकडे रीतसर अर्जासह आवश्यकतेचे सबळ कारणासह अर्ज करावा. परवाना देणा-या अधिका-यांनी याची खात्री करुन घ्यावी की संबंधित प्रतिष्ठानांनी एकतर १० एप्रिल २०२१

रोजी ऑक्सीजन वापरावर अवलंबलेली प्रक्रिया थांबविली तरी पाहिजे किंवा सुरु ठेवण्यासाठी स्पष्ट परवानगी मिळवावी.

b. **सर्व ऑक्सीजन औद्योगिक उत्पादक यांनी त्यांच्या ८०% टक्के उत्पादन (वास्तविक तसेच क्षमतेनुसार) औषधीय किंवा वैद्यकीय हेतुसाठी राखीव ठेवावे. तसेच त्यांनी त्यांचे ग्राहक घोषित करावे, आणि १० एप्रिल २०२१ पर्यंत ऑक्सीजनचा अंतिम वितरण करावा.**

## १७. ई-कॉमर्स:-

a. भारत सरकारद्वारा ठरविण्यात आलेल्या निकषाप्रमाणे घरपोच वस्तु डिलीव्हरीच्या कामात गुंतलेल्या प्रत्येकांनी लवकरात लवकर लस घ्यावी. सदरच्या व्यक्तींनी स्वत:सोबत RTPCR नकारात्मक (Negative) प्रमाणपत्र ठेवावे. सदर प्रमाणपत्र १५ दिवसापर्यंत वैध राहतील. उपरोक्त नियम १० एप्रिल २०२१ पासून लागू होतील.

b. वारंवार गुन्हा करणाऱ्या /नियमांचा भंग करणाऱ्या संस्था/आस्थापना यांचे परवाने कोविड-१९ साथीचे रोग आटोक्यात आले असल्याचे जाहीर होत नाही तो पर्यंत रद्द/जप्त करण्यात येतील.

## १८. सहकारी गृहनिर्माण संस्था:-

a. कोणत्याही सहकारी गृह निर्माण संस्था येथे **५ पेक्षा जास्त क्रियाशील कोरोना बाधित रुग्ण असल्यास, अश्या ठिकाणास सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र ( Micro Containment Zone) म्हणुन घोषित केले जाईल.**

b. अशा सहकारी गृह निर्माण संस्था यांनी त्यांच्या प्रवेश द्वारावर सूचना फलक लावून अभ्यागतांना आत येण्यास मनाई असल्याची माहिती नमूद करावी.

c. सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र ( Micro Containment Zone) येथे सर्व प्रकारचे निर्बंध उदा. नियंत्रण, प्रवेश व पत्ता या बाबत संबंधित सहकारी गृह निर्माण संस्थाद्वारा नियंत्रण करण्यात येईल.

d. सहकारी गृह निर्माण संस्था यांचे कडून कुठल्याही हलगर्जीपणा झाल्यास पहिल्यांदा १०,०००/- (दहा हजार) रु. दंड आकारण्यात येईल. नंतरच्या घटनेत किंवा दुसऱ्यांदा असे आढल्यास संबंधित तहसिलदार यांनी अधिक दंड वूसल करावा.

e. शासनाच्या निकषा प्रमाणे सर्व सहकारी गृह निर्माण संस्थेच्या इमारतीमध्ये नियमीत येणाऱ्या नागरिकांचे RTPCR तपासणी करणे गरजेचे आहे, जो पर्यंत संबंधित व्यक्तिंचे लसीकरण होत नाही.

## १९. पायाभूत संरचना बाबत:-

a. केवळ ज्या साइटवर मजुर राहतात त्याच साइट्सना कामांची परवानगी द्यावी. भौतिक हालचालींच्या(बांधकाम प्रक्रियेचे साहित्य/मटेरीयल) हेतू शिवाय बाहेरुन हालचाल करणे टाळावे.

b. भारत सरकारद्वारा ठरविण्यात आलेल्या निकषा प्रमाणे सदरच्या कामात गुंतलेल्या प्रत्येकांनी लवकरात लवकर लस घ्यावी. तोपर्यंत त्यांनी सोबत RTPCR नकारात्मक (Negative) प्रमाणपत्र ठेवावे. सदर प्रमाणपत्र १५ दिवसापर्यंत वैध राहतील. उपरोक्त नियम १० एप्रिल २०२१ पासून लागू होतील.

c. वारंवार गुन्हा करणाऱ्या /नियमांचा भंग करणाऱ्या बांधकाम करणाऱ्या साईट्सच्या डेव्हलपर वर १०,०००/- (दहा हजार) रु. दंड आकारण्यात येईल. व संबंधित ठिकाण कोविड-१९ साथीचे रोग आटोक्यात आले असल्याचे जाहिर होत नाही तो पर्यंत तेथील कामे बंद करण्यात येतील.

d. कोणत्याही बांधकाम साईट्सवर कार्यरत मजुर कोरोना बाधित असल्यास त्यांना वैद्यकीय रजा घेता येईल तसेच या कारणामुळे अनुपस्थित असलेल्या मजुरास कामावरुन कमी करता येणार नाही. सदर मजुरास पूर्ण पारिश्रमीक घेण्याचा हक्क राहील.

२०. <u>दंड:-</u>

a. सदरच्या आदेशामधील संरेखित/उल्लेखित केलेल्या सर्व प्रकारचे दंड शासनाच्या २७ मार्च २०२१ च्या आदेशाशी संलग्नीत असतील.

b. सर्व प्रकारचे संकलित केलेले दंड कोविड-१९ साथरोगसंदर्भाने उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडे रीतसर वळती करावे.

२१. <u>संकीर्ण:-</u>

a. तहसिलदार तथा अध्यक्ष तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती तथा इंसिडंन्ट कमांडर या अधिकाराने तालुका/ग्राम पातळीवरील संबंधित समित्यांचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

b. कोविड-१९ साथरोग संदर्भाने प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेसंदर्भात संबंधित क्षेत्राचे तहसिलदार यांनी आरोग्य विभागाचे समन्वयातून आवश्यक कार्यवाही करावी.

c. प्रतिबंधित क्षेत्र सीमांकन घोषित करणेसंदर्भात शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

d. प्रतिबंधित क्षेत्रामध्ये बाधित रुग्णांशी संबंधित कॉन्टॅक्ट ट्रेसिंग चे प्रमाण वाढविण्यात येऊन पहिल्या ७२ तासाच्या आत किमान ८० टक्के कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करण्यासंदर्भात आरोग्य विभागाने आवश्यक नियोजन करावे.

e. सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास मनाई आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी विना मास्क / रुमाल आढळून आल्यास दंडनीय कारवाई करण्यात येईल. विनामास्क आढळलेल्या प्रति नागरिकाला रु. ५००/- दंड आकारण्यात यावा तर सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास रु. १०००/- प्रति माणशी दंड महसूल/पोलीस/स्था.स्व.संस्था यांनी वसूल करावे.

f. उक्तप्रमाणे परवानगी नसलेले ठिकाणांमध्ये दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्यास संबंधित आस्थापना/दुकान हे **राज्यात कोविड-१९ साथरोग म्हणून जोपर्यंत घोषित असेल तोपर्यंत सील असेल**. यांसंदर्भात आवश्यक कार्यवाही महसूल/पोलीस/स्था.स्व.संस्था यांनी करावे.

g. सर्व प्रकारचे सामाजिक/सांस्कृतिक/राजकीय/धार्मिक इत्यादी विषयक इतर सर्व प्रकारचे जमावावर बंदी राहील. सदर बाबीचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर व ती खाजगी जागा ज्यांचे मालकीची आसेल त्या जागा मालकावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, भारतीय दंड संहिता व साथरोग अधिनियम अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच **सदरची जागा ही राज्यात कोविड-१९ साथरोग म्हणून जोपर्यंत घोषित असेल तोपर्यंत सील असेल.** यांसंदर्भात आवश्यक कार्यवाही महसूल/पोलीस/स्था.स्व.संस्था यांनी करावे.

h. सामाजिक अंतर राखुन **केवळ दैनंदिन बाजार** भरविण्यास परवानगी देण्यात येत आहे. जिल्ह्यात कुठेही **<u>आठवडी बाजार भरवता येणार नाही. यांसदर्भात आवश्यक खबरदारी संबंधित स्था.स्व.संस्था यांनी घ्यावी.</u>**

i. विवाहासंबंधीचे कार्यक्रमांना कमाल पन्नास (५०) लोकांच्या मर्यादेत परवानगी असेल. तथापि याचे उल्लंघन केल्यास ती खाजगी जागा ज्यांचे मालकीची असेल त्या लॉन/हॉल/सभागृह जागा मालकावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, भारतीय दंड संहिता व साथरोग अधिनियम अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच सदरची जागा ही **राज्यात कोविड-१९ साथरोग म्हणून जोपर्यंत घोषित असेल तोपर्यंत सील असेल.** यांसंदर्भात आवश्यक कार्यवाही महसूल/पोलीस/स्था.स्व.संस्था यांनी करावे.

j. अंत्यसंस्काराच्या बाबतीत वीस (२०) पेक्षा जास्त लोकांच्या जमावास मनाई आहे. सदर बाबीसंदर्भात आवश्यक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.

k. कोरानाबाधित रुग्णाला होम आयसोलेशन दिल्यानंतर त्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे उचित कार्यवाही संबंधित आरोग्य विभागाने करावी.

l. ज्या व्यक्तीचे अलगीकरण/विलगीकरणासाठी अनिवार्य केलेल्या व्यक्तिंसाठी नियमाप्रमाणे कालावधी पूर्ण करणे अनिवार्य असेल.

m. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नियंत्रित पद्धतीने सुरु ठेवण्यात यावे. कोविड-१९ साथरोगसंदर्भाने सामाजिक अंतराचे नियम न पाळणाऱ्या नागरिकांकडून संबंधित आगार व्यवस्थापक/अधिकारी/कर्मचारी प्रति माणशी रु.५००/- एवढा दंड वसूल करण्यात यावा.

n. कोविड-१९ साथरोगसंदर्भाने एकूण टेस्टपैकी आरटीपीसीआर टेस्ट चे प्रमाण हे ७० टक्क्याहून अधिक असावे याची दक्षता आरोग्य विभागाने घ्यावे.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचे आदेश आज दिनांक ०५/०४/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

Office of the District Magistrate Gadchiroli

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

**प्रतिलिपी- माहितीस्तव सादर**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

३) पोलीस अधिक्षक, गडचिरोली
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
५) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
६) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. गडचिरोली
८) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
९) पोलीस उपविभागीय अधिकारी (सर्व)
१०) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
११) गट विकास अधिकारी (सर्व)
१२) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिद्ध करावी.
१३) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन गडचिरोली.
१४) मुख्याधिकारी, नगर परिषदा/ पंचायती सर्व
१५) सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख
१६) इतर सर्व संबंधित विभाग ----------
१७) स्थळ प्रत

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

Office of the District Magistrate